




# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

**प्रेस नोट** दिनांक :-२३/०३/२०२३

---

## ऑनलाईन फ्रॉड करुन १२ लाख रुपयाची फसवणुक करणा-या टोळीतील सुत्रधारास अटक

फिर्यादी नामे राजेश पतीरा रा. धमणगांव रोड, यवतमाळ यांची MIDC यवतमाळ येथे पिव्हीसी पाईप बनविण्याची कंपनी आहे. फिर्यादी यांनी पाईप तयार करण्याकरिता अवश्यक असणारा कच्चा माल घेण्याकरिता इंडीया मार्ट या ऑनलाईन साईटवर चौकशी केली होती. त्यांना दिनांक 05/12/2022 रोजी मोबाईल क्रं.9023872097 या नंबरवरुन फोन आला व त्यांना पाहीजे असेलला कच्चा माल सप्लाय करण्यात येईल असे सांगीतले. फिर्यादी यांना फोनवरील व्यक्तीने जिएसटी पेपर, ईनव्हाईस व ई वे-बिल ईत्यादी सर्व पाठविल्याने फिर्यादी यांची खात्री झाली व त्यांनी फोनवरील व्यक्तीने सांगितल्याप्रमाणे त्यांचे SBI bank account मधुन 12 लाख रुपये समोरील व्यक्तीचे खाते क्रं. ICICI 769805500024 मध्ये ऑनलाईन ट्रान्सफर केले. समोरील मोबाईलवरुन बोलणारे ईसमाने माल भरलेल्या ट्रकचे फोटो सुध्दा पाठविले, परंतु फिर्यादी यांनी अहमदाबाद गुजरात येथे मालाबाबत चौकशी तेव्हा त्यांची फसवणुक झाल्याचे त्यांचे लक्षात येताच त्यांनी पोस्टे अवधुतवाडी येथे जावुन तक्रार दाखल केली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रार वरुन पोस्टे अवधुतवाडी येथे 1240/2022 कलम 420 भा.दं.वि सह क. 66 डी IT Act प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. तांत्रीक स्वरुपाचा गुन्हा असल्याने सदर गुन्ह्याचा तपास सायबर पोलीस स्टेशन, यवतमाळ यांचेकडे हस्तांतरित करण्यात आला.

सायबर सेल, यवतमाळ यांनी बँक स्टेटमेंट व तांत्रीक मुद्यावर बारकाईने तपास करुन यागुन्ह्यामध्ये दिनांक-22/12/2022 रोजी आरोपी नामे आकाश महादेवराव वाकोडे वय-26 वर्ष रा. 4003, विनोबाभावेनगर, विन्झोल वटवा अहमदाबाद गुजरात या आरोपीस अमरावती जिल्ह्यामधुन अटक केली होती. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आकाश वाकोडे हा मुख्य आरोपींना सिमकार्ड घेवुन देण्याचे काम करित होता तसेच यामध्ये आणखी तिन आरोपी मुख्य भुमिकेमध्ये असुन नमुद आरोपींनी फसवणुक करण्याकरिता Marudhar International नावाने कपंनी रजीस्टर केली व त्याद्वारे पिव्हीसी पाईप बनविण्याकरिता कच्चा माल देण्याचे बहाण्याने फसवणुक करित होते. फसवणुकीतील 12 लाख रुपयापैकी 5 लाख 54 हजार रुपये ~~पोलीसांनी~~ गुन्हा घडल्यानंतर काही वेळातच होल्ड करण्यात पोलीसांना यश आले असुन सायबर पोलीस स्टेशनचा या गुन्ह्यामध्ये सतत तपास सुरुच होता.

सायबर पोलीस स्टेशन, यवतमाळ येथील अधिकारी व कर्मचारी यांनी तांत्रीक कौशल्याचे आधारे अहमदाबाद गुजरात येथे जावुन तपास केला असता यामधील मुख्य भुमिकेमध्ये असलेला आरोपी दिपेश उर्फ रॉकी दयाशंकर दुबे वय 34 वर्ष यास सापळा रचुन ग्रीन पार्क सोसायटी, अहमदाबाद गुजरात (पोस्टे रामोल) येथुन दिनांक-21/03/2023 रात्री स्थानिक पोलीसांचे मदतीने ताब्यात घेवुन यवतमाळ येथे काल दिनांक-22/03/2023 रोजी संध्याकाळी यवतमाळ येथील न्यायालयासमोर हजर केले. आरोपीचा दिनांक-24/03/2023 पावेतो पिसिआर मिळाला असुन अटकेत असलेला आरोपी नामे दिपेश उर्फ रॉकी याचेसोबत आणखी दोन मुख्य साथीदार हे बिहार व उत्तर प्रदेश येथील असुन ते दोन्ही फरार आहेत. अशाच प्रकारचे गुन्हे पुणे शहर व दौंड जि. पुणे येथे सुध्दा गुन्हे नोंद आहेत. अटक असलेला आरोपी याचेकडुन गुन्ह्याची संपुर्ण पध्दत व त्यांचे साथीदारांची माहिती व ईतर माहिती समोर येण्याची शक्यता आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सायबर पोलीस स्टेशन करित असुन सदरची कार्यवाही डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, श्री. पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन यवतमाळ येथील पोनि मनिष दिवटे, सपोनि विकास मुंढे, एएसआय डेरे, पोशि सतिश सोनोने व अजय निबोंळकार यांनी पार पाडली.

(मनिष दिवटे)
पोलीस निरीक्षक
सायबर पो.ठाणे,यवतमाळ